**<u>दिनांक ०५/१०/२०१९ रोजी शपथेवर सरतपास सुरु</u>**
**<u>फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री.ए.एस.देवूसकर यांचेमार्फत</u>**

९. आता मला निशाणी १९ सोबत दाखल मुळ धनादेश दाखविणेत आला. मला दिलेला हाच तो धनादेश आहे. आरोपीने मला त्याच्या खात्यावरील हा धनादेश दिला होता. या धनादेशावर माझे व आरोपीचे नाव आहे. या धनादेशावर आरोपीची सही आहे. हा धनादेश दिनांक २०/११/२०१८ रोजी देणेत आला होता. धनादेशातील मजकूर बरोबर आहे. धनादेशास **<u>निशाणी क्र. २०</u>** देणेत आली. हा धनादेश वटला नाही म्हणून मला माझ्या बॅकेने त्याबाबत रिटर्न मेमो दिला होता. आता मला निशाणी ४ सोबत अनु.क्र.२ वरील रिटर्न मेमो दाखविणेत आला. त्यावर बॅकेचा शिक्का व सही आहे. ती मी ओळखतो. त्यामधील मजकूर बरोबर आहे. रिटर्न मेमोस **<u>निशाणी क्र.२१</u>** देणेत आली.

१०. हा धनादेश वटला नाही म्हणून मी आरोपीला माझे वकिलांमार्फत दिनांक २३/०१/२०१९ रोजी नोटीस दिली होती. आता मला निशाणी ४ अनु.क्र. ३ वरील नोटीसची स्थळप्रत दाखविणेत आली. त्यामधील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व वकिलांची सही आहे. नोटीस स्थळ प्रतीस **<u>निशाणी क्र. २२</u>** देणेत आली. ही नोटीस आरोपीला पोहोच झालेबाबत पोहोच पावती मी याकामी दाखल केली आहे. मी आरोपीला त्याच्या रहाणेच्या ठिकाणी व त्याच्या ऑफिसच्या पत्यावर नोटीस पाठविली होती. या दोन्हीं ठिकाणी आरोपीला नोटीस मिळाल्याबद्दलच्या दोन पोहोच पावत्या मी याकामी दाखल केलेल्या आहेत. आता मला या दोन पोहोच पावत्या दाखविणेत आल्या. त्यावर आरोपीचा जो पत्ता नमूद आहे तो बरोबर आहे. पोहोच पावतीस अनुक्रमे **<u>निशाणी क्र. २३ व २४</u>** देणेत आली. आरोपीला ही नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठविल्याबाबत पोस्टाकडील दोन पावत्या मी याकामी दाखल केलेल्या आहेत. आता मला या दोन पावत्या दाखविणेत आल्या. त्यावर आरोपीचे नाव व पत्ता नमुद असून तो बरोबर आहे. पावतीमधील मजकूर बरोबर आहे. पावतीस **<u>निशाणी क्र. २५ व २६</u>** देणेत आली. या नोटीस आरोपीला पोहोच झाल्याबाबत पोस्टाकडून मला त्याबाबतचा पोस्टाकडील वेबसाईटवरील पोहोच झाल्याबाबतचा तपशील दिलेला आहे.

**फिर्यादीतर्फे विधिज्ञ यांनी दाखल कागदपत्रांची पहाणी करुन पुढील सरतपास घेणेस विनंती केली असता सरतपास पुढील तारखेपर्यत तहकूब ठेवणेत आला.**

सरतपास संपला.

Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2019.10.07 12:17:53 +0530

(आर.आर.बेडगकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.

दिनांक :—०५/१०/२०१९.